MPSCKEEDA

UPSC, MPSC, COMBINE गट ब गट क, तलाठी, पोलीस भरती

एकच ॲप – अनलिमिटेड अभ्यासक्रम, अनलिमिटेड सराव!

संपूर्ण नोट्स +
अनलिमिटेड TEST सिरीज

टॉपिकनुसार नोट्स + PYQ
प्रत्येक विषयाच्या टॉपिकनुसार नोट्स + टॉपिकचे

100 TEST प्रत्येक विषय

LIVE + कोणत्याही वेळेत टेस्ट सिरीज
टॉपिकनुसार, प्रत्येक टॉपिकचे 25 प्रश्नांचे

500 TEST ऑल महाराष्ट्र रँकिंग

मिनी मॉक टेस्ट
संपूर्ण विषय किंवा कोणतेही दोन विषय • 25 प्रश्न

200 TEST विश्लेषणासहित

फुल मॉक टेस्ट
संपूर्ण पेपर स्वरूपात • दिवसाला एक टेस्ट

365 TEST विश्लेषणासहित

दिवाळी ऑफर

₹499 / एक वर्ष

किंवा

₹99 प्रति महिना

आत्ताच डाउनलोड करा

JOIN NOW • MPSCKEEDA APP

मोफत सराव, मोफत PDF, मोफत चालू घडामोडी नोट्स साठी

test.mpsckeeda.com ही वेबसाईट सुरू करा

Google Play Store वर उपलब्ध • या पानावर कुठेही टॅप करा

Maharashtra Public Service Commission Assessment

Question Paper Name :	District Women and Child Development Officer Statistical Officer Group B Paper 2 14 May 2026 Shift3
Subject Name :	District Women and Child Development Officer Statistical Officer Group B Paper 2
Creation Date :	2026-05-14 18:58:41
Duration :	60
Number of Questions :	100
Share Answer Key With Delivery Engine :	No
Actual Answer Key :	Yes

District Women and Child Development Officer Statistical Officer Group B Paper 2

Group Number :	1
Group Id :	1547872
Group Maximum Duration :	0
Group Minimum Duration :	60
Show Attended Group? :	No
Edit Attended Group? :	No
Break time :	0

District Women and Child Development Officer Statistical Officer Group B Paper 2

Section Id :	1547872
Section Number :	1
Section type :	Online
Mandatory or Optional :	Mandatory
Number of Questions :	100
Number of Questions to be attempted :	100
Maximum Instruction Time :	0
Sub-Section Number :	1
Sub-Section Id :	1547874
Question Shuffling Allowed :	Yes
Is Section Default? :	No

Question Number : 1 Question Id : 154787101 Question Type : MCQ Option Shuffling : No

भारतीय संविधानाच्या कलम ८५ नुसार संसदेची सत्रसमाप्ती व विसर्जन याबाबत खालील विधाने विचारात घेऊन उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

विधान (अ) : राष्ट्रपतीला, वेळोवेळी सभागृहांची किंवा त्यापैकी कोणत्याही सभागृहाची सत्रसमाप्ती करता येईल.

विधान (ब) : राष्ट्रपतीला लोकसभा विसर्जित करता येईल.

Options :

1. फक्त अ बरोबर

2. फक्त ब बरोबर

3. अ व ब दोन्ही बरोबर

4. अ व ब दोन्ही चूक

Question Number : 2 Question Id : 154787102 Question Type : MCQ Option Shuffling : No

खालीलपैकी कोणत्या निकषांनुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्याचे प्रशासन करण्याचा हक्क असेल ?

Options :

1. धर्म किंवा भाषा

2. धर्म किंवा जात

3. वंश किंवा जात

4. यापैकी नाही

Question Number : 3 Question Id : 154787103 Question Type : MCQ Option Shuffling : No

विधानमंडळाचा लोकलेखा समितील एकूण किती सदस्य असतात ?

Options :

1. २०

2. २५

3. ३०

4. १५

Question Number : 4 Question Id : 154787104 Question Type : MCQ Option Shuffling : No

विदर्श, मराठवाडा (उर्वरित महाराष्ट्र किंवा यथास्थिती) यांच्यासाठी स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करून मंडळाच्या कामकाजाचा अहवाल दरवर्षी राज्य विधानसभेसमोर ठेवले जाईल अशी तजवीज राज्यघटनेच्या पुढीलपैकी कुठल्या कलमात करण्यात आली आहे ?

Options :

1. कलम ३७१

2. कलम ३७२ क

3. कलम ३४३

4. कलम ३४४

Question Number : 5 Question Id : 154787105 Question Type : MCQ Option Shuffling : No

खालील विधाने विचारात घेऊन उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

अ. मुख्यमंत्री राज्यपालाकडून नियुक्त केला जाईल आणि इतर मंत्री मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानुसार राज्यपालाकडून नियुक्त केले जातील.

ब. राज्यपालाची मर्जी असेपर्यंत ते मंत्री पदे धारण करतील.

Options :

1. अ व ब दोन्ही बरोबर

2. फक्त अ बरोबर

3. फक्त ब बरोबर

4. अ व ब दोन्ही चूक

Question Number : 6 Question Id : 154787106 Question Type : MCQ Option Shuffling : No

मुंबई नागरी सेवा (प्रवासभत्ता) नियम, १९५९ मध्ये सुधारणा करून सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना स्वत: वरील विभागीय चौकशी प्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांसामोवर उपस्थित होण्यासाठी प्रवासभत्ता कोणत्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय करण्यात आला ?

Options :

1. दि. ३१. १०. १९९८ चा शासन निर्णय

2. दि. २. १०. १९९८ चा शासन निर्णय

3. दि. १. ०५. १९९८ चा शासन निर्णय

4. दि. २६. ०१. १९९८ चा शासन निर्णय

Question Number : 7 Question Id : 154787107 Question Type : MCQ Option Shuffling : No

मुंबई नागरी सेवा नियम १९५९ नुसार विमान प्रवासासंबधी तरतुदीनुसार खालील विधाने विचारात घेऊन उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

अ. सचिव किंवा सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना फक्त इकॉनॉमी क्लासनेच विमान प्रवास अनुज्ञेय राहील.

ब. मा. मंत्री यांच्या खाजगी सचिवांना ते मा. मंत्री यांच्यासोबत प्रवास करीत असतील तर विमान प्रवास अनुज्ञेय राहील.

Options :

1. फक्त अ बरोबर

2. फक्त ब बरोबर

3. अ व ब दोन्ही बरोबर

4. अ व ब दोन्ही चूक

Question Number : 8 Question Id : 154787108 Question Type : MCQ Option Shuffling : No

शासकीय सेवेकरिता आलेल्या उमदेवाराची तपासणी करणाऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्याने नेत्रदोषाच्या विकलांगतेच्या कारणावरून उमेदवारास अपाय ठरविले असेल तेव्हा अशी विकलांगता कोण माफ करू शकतील.

Options :

1. संचालक, आरोग्य सेवा

2. वैद्यकिय मंडळ

3. संबंधित वैद्यकिय अधिकारी

4. कोणीही नाही

Question Number : 9 Question Id : 154787109 Question Type : MCQ Option Shuffling : No

खालीलपैकी कोणत्या बाबींची नोंद सेवापुस्तकात घेण्यात येत नाही ?

अ. जन्म तारीख

ब. वैयक्तिक चारित्र्य

क. शैक्षणिक अर्हता

ड. सेवांतर्गत प्रशिक्षण

Options :

1. फक्त ड

2. क व ड

3. फक्त ब

4. अ, ब व क

Question Number : 10 Question Id : 154787110 Question Type : MCQ Option Shuffling : No

लेखाधिकारी म्हणजे _____.

Options :

1. भारताचे, नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी नियुक्त केलेला अधिकारी

2. ज्याच्या लेखापरिक्षा मंडळामध्ये शासकीय कर्मचारी सेवा करीत असेल

3. सेवेच्या पडताळणीच्या संबंधात सेवा केली असेल असा अधिकारी

4. उपरोक्त सर्व

Question Number : 11 Question Id : 154787111 Question Type : MCQ Option Shuffling : No

म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९, नुसार ज्या आदेशाविरूद्ध अपील करण्यात आले त्या आदेशाची प्रत अपीलकर्त्यास मिळाल्यापासून किती दिवसाच्या कालावधीत केलेले अपील विचारात घेण्यात येते ?

Options :

1. ४५ दिवसाच्या कालावधीत

2. ६० दिवसाच्या कालावधीत

3. ७५ दिवसाच्या कालावधीत

4. ९० दिवसाच्या कालावधीत

Question Number : 12 Question Id : 154787112 Question Type : MCQ Option Shuffling : No

चौकशी पूर्ण झाल्यानंतर, चौकशी प्राधिकाऱ्याकडून तयार करण्यात येणाऱ्या अहवालात पुढे दिलेल्या कोणत्या बाबी नमुद करण्यात येतात _____.

अ. दोषारोपाच्या बाबी आणि गैरवर्तणूकीच्या आरोपांचे विवरणपत्र

ब. दोषारोपाच्या प्रत्येक बांबीसंबधी पुराव्याचे मुल्यमापन

क. दोषारोपाच्या प्रत्येक बाबीवरील निष्कर्ष व त्याची कारणे

ड. शासकीय कर्मचाऱ्याने केलेला बचाव

Options :

1. केवळ अ आणि ब

2. अ, ब आणि क

3. वरील सर्व

4. ब आणि क

Question Number : 13 Question Id : 154787113 Question Type : MCQ Option Shuffling : No

म.ना.से. (वर्तणूक) नियम १९७९ अन्वये सचोटी व कर्तव्य परायणता इ. राखण्याबाबत शासकीय कर्मचाऱ्यांचे कर्तव्य विचारात घेऊन उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

प्रत्येक शासकीय कर्मचारी नेहमीच _____.

अ. राजकीदृष्ट्या तटस्थता ठेवील.

ब. उत्तरदायित्व व पारदर्शकता ठेवील.

क. लोकांप्रती विशेषता दुर्बल घटकाप्रती प्रतिसादी असेल.

ड. लोकांप्रती सौजन्य ठेवील.

Options :

1. फक्त अ, ब व ड बरोबर

2. फक्त ब व ड बरोबर

3. अ, ब, क, ड सर्व बरोबर

4. अ, ब, क, ड सर्व चूक

Question Number : 14 Question Id : 154787114 Question Type : MCQ Option Shuffling : No

श्रीमती भोसले ह्या गट ब च्या शासकीय कर्मचारी आहेत. त्यांची खालीलपैकी कोणती कृती वर्तणूक नियमाची भंग करणारी आहे ?

अ. धार्मिक समारंभाच्या वेळी जवळच्या नातेवाईकाकडून रु. १०,००० ची देणगी स्वीकारली.

ब. नियतकालीकामध्ये शासनाचा मंजूरीशिवाय साहित्यिक कलात्मक व वैज्ञानिक स्वरूपाचे लेखन केले.

Options :

1. फक्त अ

2. फक्त ब

3. अ व ब

4. कोणतीही कृती वर्तणूक नियमाचा भंग करणारी नाही.

Question Number : 15 Question Id : 154787115 Question Type : MCQ Option Shuffling : No

खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या वजाती निर्वाह भत्यामधून करता येणार नाही ? अचूक पर्याय निवडा.

अ. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणी

ब. आमकर व व्यवसायकर

क. शासकीय कर्मचारी जबाबदार असेल अशा शासकीय नुकसानीची वसुली

ड. लायसन्स फी व संलग्न आकार म्हणजे वीज, पाणी, फर्निचर इ.

Options :

1. फक्त ब

2. फक्त अ व क

3. ब व ड

4. फक्त ड

Question Number : 16 Question Id : 154787116 Question Type : MCQ Option Shuffling : No

मनासे नियमानुसार निर्वाह भत्यातून कोणती वजाती सक्तीने केली पाहिजे ?

Options :

1. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणी

2. न्यायालयीन जप्तीसबंधी देय रक्कमा

3. डाक आयुर्विम्याचे देय हप्ते

4. शासनाकडून घेतलेली कर्जे व अग्रिमे यांची परतफेड

Question Number : 17 Question Id : 154787117 Question Type : MCQ Option Shuffling : No

म.ना.से. (रजा) नियम १९८१ नुसार एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यांची पुनर्नियुक्ती न होता, त्याला मर्यादित कालावधीपेक्षा अधिक काळ जे पद धारण करता येणार नाही अशा स्थायी पदास काय म्हणतात ?

Options :

1. कायम वेतन पद

2. अस्थायी पद

3. सावधि-नियुक्ती पद

4. स्थायी पद

Question Number : 18 Question Id : 154787118 Question Type : MCQ Option Shuffling : No

श्रीमती पाटील ह्या शासकीय कर्मचारी आहेत. त्यांची रजा संपण्यापूर्वी त्यांना कामावर परत येण्याचे सक्तीचे आदेश पारीत झाले. अशा प्रसंगी खालीलपैकी कोणत्या तरतूदी योग्य आहेत ? योग्य पर्याय निवडा.

अ. ज्या तारखेपासून त्या आदेश दिलेल्या ठिकाणी जाण्यासाठी ज्या तारखेला निघतील त्या तारखेपासून त्या कामावर असल्याचे मानण्यात येईल.

ब. याबाबत केलेल्या प्रवासासाठी नियमानुसार प्रवासभत्ता मिळण्याचा हक्क त्यांना असेल.

क. पदावर रुजू होईपर्यंतच्या कालवाधीचे रजा वेतन

Options :

1. फक्त अ

2. फक्त अ व ब

3. अ, ब व क

4. कोणतीही तरतूद योग्य नाही

Question Number : 19 Question Id : 154787119 Question Type : MCQ Option Shuffling : No

निश्चित वेतन दर असलेले मर्यादित कालावधीसाठी मंजूर केलेले पद _____.

Options :

1. कायम पद

2. अस्थायी पद

3. सावाधि नियुक्ती पद

4. उपरोक्त कोणतेही नाही

Question Number : 20 Question Id : 154787120 Question Type : MCQ Option Shuffling : No

विशेष जिकरीच्या स्वरूपाची कर्तव्ये, कामामध्ये किंवा जबाबदारीमध्ये विशिष्ट वाढ यांचा विचार करून वेतनाच्या स्वरूपात दिलेली वाढ म्हणजे _____.

Options :

1. समयश्रेणी वेतन

2. विशेष वेतन

3. वैयक्तिक वेतन

4. संभाव्य वेतन

Question Number : 21 Question Id : 154787121 Question Type : MCQ Option Shuffling : No

कुटुंब निवृत्ती वेतन प्रदेय कालावधी, पुढीलप्रमाणे असेल _____.

अ. मुलाच्या बाबतीत त्याच्या वयाला एकवीस वर्षे पूर्ण होईपर्यंत.

ब. अविवाहित मुलीच्या बाबतल ती २४ वर्षे वयांची होईपर्यंत किंवा तिचा विवाह होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत.

Options :

1. फक्त अ बरोबर

2. फक्त ब बरोबर

3. अ व ब दोन्ही बरोबर

4. अ व ब दोन्ही चूक

Question Number : 22 Question Id : 154787122 Question Type : MCQ Option Shuffling : No

म.ना.से. निवृत्तीवेतन नियमानुसार खालील विधाने विचारात घेऊन उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

अ. एकापेक्षा अधिक विधवांना कुटुंब निवृत्ती वेतन प्रदये असेल तेव्हा समप्रमाणात देय आहे.

ब. दुसरा विवाह बेकायदेशीर असल्यास द्वितीय पत्नीस कुटुंब निवृत्ती वेतन अनुज्ञेय नाही.

Options :

1. विधान अ व ब दोन्ही बरोबर

2. फक्त विधान अ बरोबर

3. फक्त विधान ब बरोबर

4. विधान अ व ब दोन्ही चूक

Question Number : 23 Question Id : 154787123 Question Type : MCQ Option Shuffling : No

निवृत्तीवेतनाच्या अंशराशीकरणाबाबत पुढीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

अ. विभागीय किंवा न्यायीक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे असा कोणताही शासकीय कर्मचारी अथवा निवृत्तीवेतनाधारक निवृत्तीवेतनाच्या भागाचे अंशराशीकरण करण्यास पात्र असणार नाही.

ब. निवृत्तीवेतन मिळत असलेल्या निवृत्तीवेतनधारकास सेवानिवृत्तीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत अंशराशीकरण करण्यासाठी अर्ज केला पाहीजे.

Options :

1. फक्त अ बरोबर ब चूक

2. फक्त ब बरोबर अ चूक

3. अ व ब दोन्ही बरोबर

4. अ व ब दोन्ही चूक

Question Number : 24 Question Id : 154787124 Question Type : MCQ Option Shuffling : No

शासकीय कर्मचाऱ्याला, त्याच्या निवृत्ती-वेतनाच्या जास्तीत जास्त किती भागाचे एका ठोक रकमेतील प्रदानासाठी, अंशराशीकरण करण्याचा हक्क आहे ?

Options :

1. ४०%

2. ३०%

3. ३५%

4. ५०%

Question Number : 25 Question Id : 154787125 Question Type : MCQ Option Shuffling : No

विभागीय चौकशी संबंधीची कागदपत्रे अंतिम आदेश काढल्याच्या तारखेपासून कमीत कमी _____ वर्षाच्या कालावधीपर्यंत जतन करुन ठेवण्यात यावीत.

Options :

1. ५ वर्षे

2. ४ वर्षे

3. ६.५ वर्षे

4. ३ वर्षे

Question Number : 26 Question Id : 154787126 Question Type : MCQ Option Shuffling : No

नोकरी करणाऱ्या महिलांसाठी केन्द्र सरकारने निवासव्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी सुरु केलेली योजना _____.

Options :

1. सखी-एक थांबा

2. वर्किंग वूमन होस्टेल (WWH)

3. निवारा योजना

4. सखी निवास

Question Number : 27 Question Id : 154787127 Question Type : MCQ Option Shuffling : No

काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकास खालीलपैकी कोणापुढे हजर करण्यात येते.

Options :

1. जिल्हाधिकारी

2. जिल्हा बाल कल्याण अधिकारी

3. बाल कल्याण समिती

4. बालन्याय मंडळ

Question Number : 28 Question Id : 154787128 Question Type : MCQ Option Shuffling : No

सती आयोग (प्रतिबंध) अधिनियम १९८७ नुसार, जो कोणी सती प्रथेच्या गौरवासाठी कोणतेही कृत्य करेल तो खालीलपैकी कोणत्या शिक्षेस पात्र ठरेल _____.

Options :

1. १ वर्षापेक्षा कमी परंतु ७ वर्षापर्यत वाढू शकणाऱ्या मुदतीच्या कारावासाची आणि ५ हजारापेक्षा कमी नसलेल्या परंतु ३० हजारा रुपया पर्यंत वाढू शकणाऱ्या दंडाची शिक्षा होईल

2. ३ वर्षापेक्षा कमी नाही व ५ वर्षापर्यत वाढू शकणारी कारावासाची शिक्षा आणि रु ११ हजारापर्यंत दंड

3. ५ वर्षापेक्षा कमी नाही व ७ वर्षापर्यंत वाढू शकणाऱ्या शिक्षा आणि २१ हजारापर्यंत दंड

4. ७ वर्षापेक्षा कमी नाही व १४ वर्षापर्यंत वाढू शकणारी कारावासाची शिक्षा

Question Number : 29 Question Id : 154787129 Question Type : MCQ Option Shuffling : No

मिशनशक्ती अंतर्गत कार्यरत 'महिला सक्षमीकरण केन्द्र' योजनेचे उद्दीष्ट्य नमदू करा _____.

अ. महिलांची संपूर्ण क्षमता जागृत होण्यासाठी जनजागृती करणे.
ब. महिलांसाठी शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या कार्यपद्धतीमधील त्रूटी दूर करणे.
क. शासकीय योजनांमध्ये महिलांचा सहभाग व उपयोगिता वाढविण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.
ड. वरील सर्व.

Options :

1. फक्त अ व क

2. फक्त अ व ब

3. फक्त व

4. वरिल सर्व

Question Number : 30 Question Id : 154787130 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालन्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 नुसार बालकासंबंधित अभ्यास अहवाल खालीलपैकी कोणत्या कलमानुसार सादर केला जातो.

Options :

1. 30

2. 40

3. 60

4. 20

Question Number : 31 Question Id : 154787131 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालकांची (काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या) काळजी घेणाऱ्या प्रत्येक संस्थेत व्यवस्थापनासाठी आणि प्रत्येक बालकाच्या प्रगतीचे सनियंत्रण करण्यासाठी एक व्यवस्थापन समिती असते, सदर समितीचे अध्यक्ष खालीलपैकी कोण असते _____.

Options :

1. वैद्यकीय अधिकारी

2. मानशास्त्रज्ञ

3. शिक्षक

4. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी

Question Number : 32 Question Id : 154787132 Question Type : MCQ Option Shuffling : No

अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ मधील कलम ६ नुसार एखाद्या व्यक्तीस कुंटणखान्यामध्ये अडकवून ठेवल्यास शिक्षेची तरतूद खालील कोणती आहे, –

Options :

1. ३ वर्षापर्यत कारावास आणि १०००० /– द्रव्यदंड

2. ७ वर्षापेसा कमी नाही पण आजीव असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा दहा वर्षापर्यंत कारावास यापैकी एक तसेच द्रव्यदंड

3. ५ वर्षापर्यत कारावास आणि १०००/द्रव्यदंड

4. १० वर्षापर्यत सक्षम कारावास

Question Number : 33 Question Id : 154787133 Question Type : MCQ Option Shuffling : No

अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार खालील पैकी _____ यांना आहेत.

Options :

1. आयुक्त, महिला व बालविकास विभाग

2. आयुक्त, समाजकलयाण

3. विभागीय उप आयुक्त, महिला व बालविकास विभाग

4. जिल्हाधिकारी

Question Number : 34 Question Id : 154787134 Question Type : MCQ Option Shuffling : No

बाल न्याय मंडळाचे (JJB) अध्यक्ष कोण असतात ?

Options :

1. बालकांच्या क्षेत्रात विशेष योगदान असलेली व्यक्ती

2. बालकांच्या क्षेत्रात विशेष कामकाज केलेली महिला

3. प्रथमश्रेणी न्याय दंडाधिकारी

4. विधीसेवा प्राधिकरणांचा जिल्हा अध्यक्ष

Question Number : 35 Question Id : 154787135 Question Type : MCQ Option Shuffling : No

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार (PMRBP) हा कोणत्या वयोगटातील मुलांना देण्यात येतो.

Options :

1. 0 ते 18

2. 6 ते 18

3. 6 ते 16

4. 5 ते 18

Question Number : 36 Question Id : 154787136 Question Type : MCQ Option Shuffling : No

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी कार्य करणारी कमिती कोणती ?

Options :

1. बालक पुनर्वसन समिती

2. बाल न्याय समिती

3. बाल कल्याण समिती

4. बालहवक समिती

Question Number : 37 Question Id : 154787137 Question Type : MCQ Option Shuffling : No

'बेटी बचावो बेटी पढाओ' ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यातील सर्व जिलह्यात राबविण्यास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली असून या योजनेचा मुख्य उद्देश खालीलपैकी कोणता आहे ?

अ. लिंग निवडीस प्रतिबंध करणे.

ब. बालिकांच्या जीवनमानाच्या सुरक्षेबदल खात्री देणे

क. बालिकांच्या शिक्षणाबाबत खात्री देणे

Options :

1. फक्त अ व ब

2. फक्त ब व क

3. फक्त अ व क

4. वरील सर्व

Question Number : 38 Question Id : 154787138 Question Type : MCQ Option Shuffling : No

आदिवासी भागातील कुपोषण आणि बालमृत्यु थांबाविण्यासाठी कोणती योजना राबविण्यात येते ?

Options :

1. डॉ. अब्दूल कलाम अमृत आहार योजना

2. बिरसा मुंडा आहार योजना

3. शबरी अमृत आहार योजना

4. वरीलपैकी सर्व

Question Number : 39 Question Id : 154787139 Question Type : MCQ Option Shuffling : No

महीलांच्या अर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटूंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने _____ ही योजना सुरू केली आहे.

Options :

1. लखपती दिदी योजना

2. लेक लाडकी योजना

3. पंतप्रधान मातृ वंदना योजना

4. मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजना

Question Number : 40 Question Id : 154787140 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालसंगोपन योजनेअंतर्गत लाभार्थीला दरमहा रु. _____ इतके अनुदान देण्यात येते.

Options :

1. 2,550/-

2. 2,450/-

3. 2,350/-

4. 2,250/-

Question Number : 41 Question Id : 154787141 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालकांचे लैंगिक आत्याचारापासून संरक्षण (POSCO) कायदा 2012 नुसार गुन्ह्यांचे प्रकार कोणते आहेत ?

अ. लैंगिक अत्याचार

ब. गंभीर लैंगिक अत्याचार

क. लैंगिक छेडछाड

ड. बालकांचा अश्ललितेसाठी वापर

Options :

1. अ, क आणि ड

2. ब, क अणि ड

3. अ, ब आणि क

4. वरीलपैकी सर्व

Question Number : 42 Question Id : 154787142 Question Type : MCQ Option Shuffling : No

बाल विवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ मधील कोणत्या कलमान्वये बाल विवाह प्रतिबंध अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येते ?

Options :

1. कलम – २

2. कलम – १२

3. कलम – १४

4. कलम – १६

Question Number : 43 Question Id : 154787143 Question Type : MCQ Option Shuffling : No

हुंडा प्रतिबंध अधिनियम 1961 च्या कलम 8(ख) अन्वये _____यांची नियुक्ती केली आहे.

Options :

1. हुंडा निरीक्षक

2. हुंडा प्रतिबंध अधिकारी

3. विधी अधिकारी

4. समुपदेक्षक

Question Number : 44 Question Id : 154787144 Question Type : MCQ Option Shuffling : No

आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमीत्त _____ रोजी महाराष्ट्र शासनाकडून महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली.

Options :

1. 2 ऑक्टोबर 1975

2. 24 फेब्रुवारी 1975

3. 8 मार्च 1975

4. 1 जानेवारी 1975

Question Number : 45 Question Id : 154787145 Question Type : MCQ Option Shuffling : No

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत पिडीत व्यक्तीला तिच्यावर झालेल्या हिंसेच्या विरूध्द् दाद मागण्यासाठी पिडीत व्यक्ती किंवा संरक्षण अधिकारी किंवा पिडीत व्यक्तीच्या वतीने इतर कोणत्याही व्यक्ती मार्फत खालीलपैकी कोणत्या कलमान्वये न्यायालयात अर्ज दाखल करता येतो ?

Options :

1. कलम ९

2. कलम १२

3. कलम १०

4. कलम ११

Question Number : 46 Question Id : 154787146 Question Type : MCQ Option Shuffling : No

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत संरक्षण अधिकाऱ्यांचे खालिलपैकी कर्तव्य कोणते आहे ?

अ. या कायद्यांतर्गत न्यायदंडाधिकाऱ्यांना त्यांचे कार्य पार पाडण्यास सहाय्य करणे.

ब. कायदेशीर मदत किंवा समुपदेशन, निवारागृहे या सर्व सुविधा प्रदान करणाऱ्या सर्व सेवा प्रदात्यांची यादी ठेवणे.

क. पिडीत व्यक्तिला संरक्षण आदेश मिळवून देण्यासाठी दंडाधिकाऱ्यांकडे विहीत केलेल्या स्वरूपात व पद्धतीने अर्ज करणे.

ड. कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ अंतर्गत पीडीत व्यक्तिला कायदेशीर मदत मिळवून देण्यास सहाय्य करणे.

Options :

1. फक्त अ

2. फक्त अ व ब

3. फक्त अ, ब व क

4. वरील सर्व

Question Number : 47 Question Id : 154787147 Question Type : MCQ Option Shuffling : No

खालिल पैकी कोणने विधान/विधाने बरोबर आहे/आहेन ?

A. कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2006 च्या कलम 8 अन्वये संरक्षण अधिकारी यांची नेमणूक करण्यात येते.

B. कौटुंबिक घटना अहवाल संरक्षण अधिकारी तयार करतात.

C. संरक्षण अधिकारी यांना न्यायिक अधिकार अहित.

Options :

1. A

2. A व B

3. B व C

4. C

Question Number : 48 Question Id : 154787148 Question Type : MCQ Option Shuffling : No

अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ या कायदयाच्या कलम १४ अन्वये खालील पैकी कोणत्या अधिकारी यांची अधिकार कर्तव्ये दिली आहेत ?

Options :

1. संरक्षण अधिकारी

2. पोलिस अधिकारी

3. परिविक्षा अधिकारी

4. जिल्हा दंडाधिकारी

Question Number : 49 Question Id : 154787149 Question Type : MCQ Option Shuffling : No

भारतीय दंड संहितेच्या आयपीसी कलम 304 (B) नुसार विवाहानंतर किती वर्षात पत्नीचा मृत्यु हुंडा छळामुळे झाला असेल तर तो हुंडा मृत्यु समजला जातो ?

Options :

1. विवाहनंतर पाच वर्षाच्या आत

2. विवाहनंतर सहा वर्षाच्या आत

3. विवाहनंतर सात वर्षाच्या आत

4. विवाहनंतर आठ वर्षाच्या आत

Question Number : 50 Question Id : 154787150 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालकामगार (प्रतिबंध व नियमन) 1986 मध्ये सुधारणा केलेल्या अधिनियमाचे नाव आणि कोणत्या कलमान्वये घोषित करण्यात आले ?

अ. बाल व किशोर कामगार अधिनियम, 1966 (सुधारित 1976) कलम 3

ब. बाल व किशोर कामगार अधिनियम, 1976 (सुधारित 2006) कलम 9

क. बाल व किशोर कामगार अधिनियम, 1986 (सुधारित 2016) कलम 3

ड. बाल व किशोर कामगार अधिनियम, 1976 (सुधारित 2006) नियम 6

Options :

1. अ

2. ब

3. ड

4. क

Question Number : 51 Question Id : 154787151 Question Type : MCQ Option Shuffling : No

कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ थांबविण्यासाठी कोणत्या उपाय योजना करण्यात आल्या आहेत ?

अ. कार्यालयातील विश्वासू महिला समितीची अध्यक्ष

ब. दहा कर्मचारी असलेल्या कार्यालयात समिती

क. स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी बंधनकारक

ड. समितीत सर्व सदस्य महिलाच असाव्यात

Options :

1. केवळ अ आणि ब बरोबर

2. केवळ ब आणि क बरोबर

3. केवळ अ, ब आणि क बरोबर

4. वरील सर्व बरोबर

Question Number : 52 Question Id : 154787152 Question Type : MCQ Option Shuffling : No

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम 2013 मध्ये नमूद तरतूदी नूसार नियोक्त्याने अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन न केल्यास रु. _____ एवढया रक्कमेचा दंडाची शिक्षा आहे.

Options :

1. 10,000/-

2. 30,000/-

3. 40,000/-

4. 50,000/-

Question Number : 53 Question Id : 154787153 Question Type : MCQ Option Shuffling : No

चिल्ड्रेन एड सोसायटी, मुंबई या संस्थेची स्थापना _____ साठी करण्यात आली.

Options :

1. विधवा, निराधार व घटस्फोटीत महिलांच्या पुनर्वसनाकरीता

2. एच. आय. व्ही. बाधित बालकांच्या संगोपनाकरीता

3. विधी संघर्षग्रस्त बालकांना विधी सेवा देण्याकरिता

4. अनाथ, निराधार, निराश्रीत मुलांच्या सर्वांगीण विकासाकरिता

Question Number : 54 Question Id : 154787154 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालकांच्या मदतीसाठी सुरु केलेला चाईल्ड हेल्प लाईन नंबर कोणता आहे ?

Options :

1. 1091

2. 1098

3. 1096

4. 1097

Question Number : 55 Question Id : 154787155 Question Type : MCQ Option Shuffling : No

राज्यस्तरावर 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेचा आढावा घेण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली _____ स्थापन करण्यात आली आहे.

Options :

1. नोडल समिती

2. सामजिक शक्ति प्रदत्त समिति

3. स्टेट टास्क फोर्स (STF)

4. हाय पावर कमिटी (HPC)

Question Number : 56 Question Id : 154787156 Question Type : MCQ Option Shuffling : No

एकात्मीक बालविकास सेवा योजनेचे खालील पैकी कोणते लाभार्थी नाहीत ?

Options :

1. सहा वर्षाखालील बालके

2. गरोदर व स्तनदा माता

3. किशोरवयीन मुली

4. वयवर्ष 50 व त्यापुढील वयाच्या महिला

Question Number : 57 Question Id : 154787157 Question Type : MCQ Option Shuffling : No

अंगणवाडी केंद्रामार्फत अंगणवाडीच्या लाभार्थ्यांना एकूण _____ सेवा दिल्या जातात.

Options :

1. पाच

2. सहा

3. सात

4. आठ

Question Number : 58 Question Id : 154787158 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालशिक्षणाच्या वाटेवरचा एक मैलाचा दगड म्हणजे संविधानातील _____ घटनादुरुस्ती होय.

Options :

1. 84 वी

2. 86 वी

3. 88 वी

4. 82 वी

Question Number : 59 Question Id : 154787159 Question Type : MCQ Option Shuffling : No

महिला व बाल विकास क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समाज सेविका व संस्थांना देण्यात-येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराचे खालीलपैकी अचूक स्वरूप कोणते आहे ?

अ. राज्यस्तरीय वैयक्तिक

ब. जिल्हास्तरीय वैयक्तिक

क. विभागीय स्तर (संस्थेसाठी)

ड. जिल्हास्तरीय (संस्थेसाठी)

Options :

1. फक्त अ

2. फक्त ब

3. फक्त ड

4. फक्त अ, ब व क

Question Number : 60 Question Id : 154787160 Question Type : MCQ Option Shuffling : No

सन _____ हे पहिले आंतरराष्ट्रीय बालक वर्ष म्हणून सर्वत्र साजरे करण्यात आले.

Options :

1. 1978

2. 1979

3. 1980

4. 1981

Question Number : 61 Question Id : 154787161 Question Type : MCQ Option Shuffling : No

महिला आर्थिक विकास महामंडळाबाबत अयोग्य विधान कोणते ?

Options :

1. महामंडळाची स्थापना 1975 साली झाली

2. महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून घोषीत केले

3. ग्रामीण भागातील महिलांचे संघटन करणे हा उद्देश आहे

4. महिला आर्थिक विकास महामंडळाचे कार्यालय नागपूर येथे आहे

Question Number : 62 Question Id : 154787162 Question Type : MCQ Option Shuffling : No

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 अन्वये महिला व बालकल्याण समितीची स्थापना कोणत्या कलमानुसार केली जाते ?

Options :

1. कलम 75

2. कलम 76

3. कलम 78

4. कलम 79

Question Number : 63 Question Id : 154787163 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालकांच्या पुर्नवसनासाठी वैयक्तीक योजना (Individual Care Plan) का आवश्यक आहे ?

Options :

1. सर्वासाठी समान योजना लागु करण्यासाठी

2. प्रशासकिय सोय पाहण्यासाठी

3. अहवाल तयार करण्यासाठी

4. बालकांच्या गरजेनुसार मदत देण्यासाठी

Question Number : 64 Question Id : 154787164 Question Type : MCQ Option Shuffling : No

राज्यगृहा बाबत खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.

अ. निराधार, निराश्रित, परित्यक्त्या, कुमारी माता, संकटग्रस्त, अत्याचाराला बळीं पडलेल्या महिलांना राज्यगृहांमध्ये प्रवेश मिळु शकतो.

ब. लाभधारक महिलांची वयोमर्यादा १६ ते ६० वर्ष असणे आवश्यक आहे.

क. या गृहामधे लाभधारक महिला दिर्घकाळ राहु शकतात.

ड. या गृहामधे महिलांना शिक्षणाची व पुनर्वसनाची सोय केली जाते.

Options :

1. फक्त अ बरोबर

2. फक्त अ व ब बरोबर

3. फक्त अ, ब व क बरोबर

4. वरील सर्व बरोबर

Question Number : 65 Question Id : 154787165 Question Type : MCQ Option Shuffling : No

राज्य घटनेमधे कोणत्या घटना दुरुस्तीनुसार कलम 21-A समाविष्ट करण्यात आले आहे ?

Options :

1. 42 वी घटना दुरुस्ती

2. 86 वी घटना दुरुस्ती

3. 52 वी घटना दुरुस्ती

4. 74 वी घटना दुरुस्ती

Question Number : 66 Question Id : 154787166 Question Type : MCQ Option Shuffling : No

अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतीचा लाभ घेता यावा,याकरिता महिला व बाल विकास विभागाचे शासन निर्णयानुसार अनाथ मुलांना शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण जाहिर करण्यात आले. या अनाथ आरक्षण धोरणामध्ये खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

अ. अनाथ आरक्षणाची अंमलबजावणी दिव्यांग आरक्षणाच्या धर्तीवर करण्यात येईल.

ब. अनाथ आरक्षणाची पदे ही पदभरतीसाठी उपलब्ध पद संख्येच्या व शैक्षणिक प्रवेशासाठी उपलब्ध पदांच्या १% असतील.

क. सदर आरक्षण शैक्षणिक संस्था, वसतीगृहे व व्यावसायिक शिक्षण प्रवेशासाठी लागू राहतील.

Options :

1. फक्त अ व ब बरोबर

2. फक्त अ, ब व क बरोबर

3. फक्त अ बरोबर

4. वरील सर्व चुक आहेत

Question Number : 67 Question Id : 154787167 Question Type : MCQ Option Shuffling : No

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह योजना अंतर्गत मुलींच्या विवाहासाठी आवश्यक असलेल्या वस्तुची खरेदी करण्यासाठी देण्यास येणाऱ्या प्रति जोडप्याकरीता किती अनुदान शासनाकडून दिले जाते ?

Options :

1. प्रती जोडपे रू. १०,०००/-

2. प्रती जोडपे रू. १५,०००/-

3. प्रती जोडपे रू. २५,०००/-

4. प्रती जोडपे रू. २०,०००/-

Question Number : 68 Question Id : 154787168 Question Type : MCQ Option Shuffling : No

महाराष्ट्र शासनाने ० ते १८ वर्षे वयोगटाखालील मुलां-मुर्लीना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटूंब उपलब्ध करून कौटूंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणण्यासाठी बाल संगोपन योजनेचे नाव बदलून खालीलपैकी कोणत्या नावाने ओळखण्यास मान्यता देण्यात आलेली आहे ?

Options :

1. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले कन्या संगोपन योजना

2. पर्यायी कुटूंब बाल संगोपन योजना

3. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना

4. क्रांती सुर्य महात्मा ज्योतिबा फुले बाल संगोपन योजना

Question Number : 69 Question Id : 154787169 Question Type : MCQ Option Shuffling : No

देवदासी व त्यांच्या मुलींच्या विवाह अनुदानासंदर्भात खालीलपैकी कोणते पर्याय बरोबर आहे.

अ. अर्जदार देवदासी ही १९९६ पूर्वीची मान्यता प्राप्त देवदासी असावी.

ब. १० वर्षाचे महाराष्ट्रातील वास्तव्य असावे.

क. मुलींना विवाहासाठी विवाह सोहळ्याच्या खर्चाकरिता मुलगी पदवीधर नसल्यास २५,०००/- रूपये मदत.

ड. मुलींना विवाहासाठी विवाह सोहळयाच्या खर्चा करिता मुलगी पदवीधर असल्यास १,००,०००/- रू. मदत.

Options :

1. फक्त अ बरोबर

2. फक्त अ व ब बरोबर

3. अ, ब व क बरोबर

4. सर्व बरोबर

Question Number : 70 Question Id : 154787170 Question Type : MCQ Option Shuffling : No

महाराष्ट्र शासनाकडून बलात्कार, बालकांवरील लैंगीक अत्याचार तसेच ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या पीडितांच्या पुनर्वसनासाठी राज्यात "मनोधैर्य योजना" कधी सुरु करण्यात आली ?

Options :

1. २ ऑक्टोबर २०११

2. २ ऑक्टोबर २०१२

3. २ ऑक्टोबर २०१३

4. २ ऑक्टोबर २०१४

Question Number : 71 Question Id : 154787171 Question Type : MCQ Option Shuffling : No

आयसीपीएस (ICPS) चा पूर्णरूप काय आहे ?

Options :

1. Integrated Child Protection Scheme

2. Integrated Child Prevention Scheme

3. Indian Child Protection Scheme

4. Indian Child and Parent Scheme

Question Number : 72 Question Id : 154787172 Question Type : MCQ Option Shuffling : No

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व महाराष्ट्र राज्य बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदीनुसार अनुरक्षण गृहामधे कोणत्या वयोगटातील मुला मुलींना प्रवेश देण्यात येतो ?

Options :

1. वय 16 वर्षापेक्षा कमी

2. वय 16 ते 18 वर्ष

3. वय 18 ते 21 वर्ष

4. वय 21 ते 25 वर्ष

Question Number : 73 Question Id : 154787173 Question Type : MCQ Option Shuffling : No

लेक लाडकी ही योजना सुरुवातीला कोणत्या नावाने सुरू करण्यात आली होती.

Options :

1. सुकन्या योजना

2. लेक लाडकी योजना

3. माझी मुलगी–माझा अभिमान

4. भाग्य विधाती

Question Number : 74 Question Id : 154787174 Question Type : MCQ Option Shuffling : No

मिशन शक्ती या योजनेतील संबल या उपयोजनेंतर्गत _____ ही घटक योजना आहे.

Options :

1. ग्राम बाल विकास केंद्र

2. नागरी बाल विकास केंद्र

3. पाळणाघर

4. वन स्टॉप सेंटर

Question Number : 75 Question Id : 154787175 Question Type : MCQ Option Shuffling : No

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 च्या कलम 106 अन्वये _____ ची स्थापना करण्यात आली आहे.

Options :

1. बाल न्याय मंडळ

2. बाल कल्याण समिती

3. निरीक्षणगृहे

4. जिल्हा बाल संरक्षण कक्ष

Question Number : 76 Question Id : 154787176 Question Type : MCQ Option Shuffling : No

'पोषण भी पढाई भी' कार्यक्रमा अंतर्गत 0-3 वर्षे वयोगटातील बालकांसाठी कृती आधारीत अभ्यासक्रम कोणता ?

Options :

1. आरंभ

2. आकार

3. आधारशिला

4. नवचेतना

Question Number : 77 Question Id : 154787177 Question Type : MCQ Option Shuffling : No

'माझी कन्या भाग्यश्री' अधिक्रमित करुन महिला व बालविकास विभागाने कोणती नवीन योजना सुरु केली आहे ?

Options :

1. लाडकी बहिण योजना

2. सुकन्या समृद्धी योजना

3. लाडकी कन्या योजना

4. लेक लाडकी योजना

Question Number : 78 Question Id : 154787178 Question Type : MCQ Option Shuffling : No

एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे खालील पैकी कोणती उद्दीष्टे आहेत ?

अ. 0 ते 6 वर्षे वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे.

ब. मुलांच्या योग्य मानसिक, शारीरिक, सामाजिक विकासाचा पाया घालणे.

क. बालमृत्यूचे व मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे.

ड. बाल विकासास चालना मिळावी म्हणून विविध विभागांमध्ये धोरण व अंमलबजावणी बाबत परिणामकारक समन्वय साधणे.

Options :

1. अ, ब, क

2. अ, ब, ड

3. अ, ब, क, ड

4. ब, क, ड

Question Number : 79 Question Id : 154787179 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालस्नेही म्हणजे बालकांबाबत घडणारी कुठलीही वर्तणुक, आचरण, रीत, दृष्टीकोन, परीसर किंवा उपचार हे मानवतेचे दयाळु आणि सर्वोत्तम हिताचे असावे हि व्याख्या कोणत्या अधिनियमाने करण्यात आली आहे ?

Options :

1. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005

2. बालन्याय अधिनियम (काळजी आणि संरक्षण) 2015

3. भारतीय नागरीकत्व कायदा 1955

4. लैगिंक गुन्ह्यापासुन बालकांचे संरक्षण कायदा 2012

Question Number : 80 Question Id : 154787180 Question Type : MCQ Option Shuffling : No

सर्वसमावेशित बालशिक्षण ही संकल्पना काय आहे ?

Options :

1. ज्या बालकांना वगळले जाऊ शकते किंवा दुर्लक्षित केले जाऊ शकते अशांना मुख्य शिक्षणप्रवाहात संधी मिळणे

2. अभ्यासक्रमात सर्व प्रकारच्या शिक्षणाचा समावेश करणे.

3. शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही बाबींचा शिक्षणात समावेश करणे.

4. पुर्वशालेय शिक्षणात सर्व बालकांचा समावेश करणे.

Question Number : 81 Question Id : 154787181 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालकाच्या वयाच्या वर्षाअखेर त्याच्या उंचीत किती वाढ होत असते ?

Options :

1. २० सें. मी.

2. १२ सें. मी.

3. २५ सें. मी.

4. २२ सें. मी.

Question Number : 82 Question Id : 154787182 Question Type : MCQ Option Shuffling : No

६ महिन्याच्या आतील बालकाला आईने कधी स्तनपान करु नये.

Options :

1. बाळ आजारी असतांना

2. आई आजारी असताना

3. बाळाची इच्छा नसताना

4. वरिल पैकी नाही

Question Number : 83 Question Id : 154787183 Question Type : MCQ Option Shuffling : No

शासन निर्णय दि. _____ नुसार नवजात बालकांना बेबी केअर कीट देण्याची योजना संपूर्ण महाराष्ट्रात कधी पासून सुरु करण्यांत आली.

Options :

1. २६ जानेवारी २०१९

2. ०२ ऑक्टोबर २०२०

3. १ डिसेंबर २०१८

4. १ सप्टेंबर २०१९

Question Number : 84 Question Id : 154787184 Question Type : MCQ Option Shuffling : No

योग्य पर्याय निवडा.

विधान (A) : नवजात बाळाला जन्मानंतर लगेच मध किंवा गोड पाणी दयावे.

कारण (B) : आईचे पहिले दूध (कोलोस्ट्रम) बाळासाठी अपायकारक असते.

Options :

1. विधान (A) व कारण (B) दोन्ही चूकीचे आहेत

2. विधान (A) चूकीचे आहे पण कारण (B) बरोबर आहे

3. विधान (A) बरोबर आहे पण कारण (B) चूकीचे आहे

4. विधान (A) व कारण (B) दोन्ही बरोबर आहेत व कारण हे विधानाचे योग्य स्पष्टीकरण आहे

Question Number : 85 Question Id : 154787185 Question Type : MCQ Option Shuffling : No

शासनाने 'पोषण अभियान' कार्यक्रम राबविण्यास कोणत्या वर्षापासून सुरुवात केली ?

Options :

1. 2014

2. 2018

3. 2021

4. 2024

Question Number : 86 Question Id : 154787186 Question Type : MCQ Option Shuffling : No

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शैक्षणिक रचनेत पायाभुत स्तर वयोगट कोणता ?

Options :

1. 6 वर्ष ते 12 वर्ष

2. 3 वर्ष ते 12 वर्ष

3. 3 वर्ष ते 8 वर्ष

4. 2 वर्ष ते 8 वर्ष

Question Number : 87 Question Id : 154787187 Question Type : MCQ Option Shuffling : No

एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यक्रमा अंतर्गत SNP शब्दाचे दिर्घ रूप काय आहे ?

Options :

1. Social Nutrition Programme

2. School Nutrition Programme

3. State Nutrition Programme

4. Suplimentary Nutrition Programme

Question Number : 88 Question Id : 154787188 Question Type : MCQ Option Shuffling : No

योग्य पर्याय निवडा.

विधान (A) : जन्माच्या वेळी बाळाचे सामान्य वजन 2.5 Kg ते 3.5 Kg च्या दरम्यान असते.

कारण (B) : गरोदरपणात वजन अजिबात वाढू नये.

Options :

1. विधान (A) व कारण (B) दोन्ही चूक आहेत

2. विधान (A) व कारण (B) दोन्ही बरोबर आहेत

3. विधान (A) बरोबर आहे पण कारण (B) चूकीचे आहे

4. विधान (A) चूकीचे आहे पण कारण (B) बरोबर आहे

Question Number : 89 Question Id : 154787189 Question Type : MCQ Option Shuffling : No

गरोदर महिलेसाठी असलेल्या 'प्रधानमंत्री मातृवंदन योजने' अंतर्गत पात्र लाभार्थी महिलेने विहीत अटी, शर्ती आणि कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर पात्र महिलेला पहिल्या अपत्यासाठी दोन हफ्यात मिळून एकूण _____ रुपये इतकी रक्कम दिली जाते.

Options :

1. 10000

2. 12000

3. 8000

4. 5000

Question Number : 90 Question Id : 154787190 Question Type : MCQ Option Shuffling : No

'कांगारू मदर केअर' बाबत योग्य पर्याय निवडा.

a. बाळ आईच्या उघड्या छातीवर ठेवले जाते व कपड्याने घट्ट झाकले जाते.

b. या पद्धतीत बाळाला स्तनपान करता येत नाही.

c. बाळाला सुरक्षितता भेटते.

d. बाळाचे तापमान नियंत्रित राहते.

Options :

1. फक्त विधान a चूक आहे

2. फक्त विधान b चूक आहे

3. फक्त विधान d चूक आहे

4. वरील सर्व विधान बरोबर आहेत

Question Number : 91 Question Id : 154787191 Question Type : MCQ Option Shuffling : No

अंगणवाडीतील बालकांची नियमित उपस्थिती, आहार वाटप, वजत-उंची इ. नोंदी घेण्यासाठी शासनामाफेत अंगणवाडी सेविकांसाठी खालीलपैकी कोणते ऑनलाईन ॲप उपलब्ध करुन देण्यात आले आहे ?

Options :

1. माझी अंगणवाडी ॲप

2. पोषण ट्रॅकर ॲप

3. अंगणवाडी टेक ॲप

4. पोषण अभियान ॲप

Question Number : 92 Question Id : 154787192 Question Type : MCQ Option Shuffling : No

गंभीर तीव्र कुपोषीत (SAM) बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्यासाठी देण्यात येणाऱ्या EDNF चे पूर्ण विस्तारीत रूप (Fullform) ओळखा.

Options :

1. Every Day Nutritious Food

2. Energy Dense Nutritious Food

3. Energy Dense Neutron Food

4. Energy Day Neutron Food

Question Number : 93 Question Id : 154787193 Question Type : MCQ Option Shuffling : No

बालकाचा सर्वांगीण विकास खेळाच्या माध्यमातून होण्यास मदत होते.

खालीलपैकी बालकाच्या विकासाचे क्षेत्र आणि खेळप्रकार व साहित्य यांच्या योग्य जोडया लावा.

अ. भाषा विकास	i. कोडी
ब. बोधात्मक विकास	ii. शब्दकोडी
क. सामाजिक व भावनिक विकास	iii. धसरगुंडी
ड. शारीरिक विकास	iv. बाहूली घर

Options :

1. अ – ii ब – i क – iii ड – iv

2. अ – ii ब – i क – iv ड – iii

3. अ – i ब – ii क – iii ड – iv

4. अ – iii ब – ii क – i ड – iv

Question Number : 94 Question Id : 154787194 Question Type : MCQ Option Shuffling : No

कडधान्यास मोड आणल्याने _____.

a. त्यामध्ये अमायलेज तयार होते त्यामुळे अन्त पचनास मदत होते.

b. पचनास विरोध करणारे घटक कमी होतात.

c. जीवनसत्व ब आणि क तयार होतात. त्यामुळे अन्नाची गुणवत्ता वाढते.

Options :

1. फक्त a व b बरोबर

2. फक्त b व c बरोबर

3. फक्त a व c बरोबर

4. वरील सर्व बरोबर

Question Number : 95 Question Id : 154787195 Question Type : MCQ Option Shuffling : No

कुपोषित बालकांवर उपचार करणारे 3 स्तर कोणते ?

Options :

1. ग्राम बालविकास केंद्र, बालउपचार केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र

2. प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य पथक

3. ग्रामिण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, बालउपचार केंद्र

4. राष्ट्रीय बाल स्वास्थपथक, प्राथमिक आरोग्य केंद्र, पोषण पुनर्वसन केंद्र

Question Number : 96 Question Id : 154787196 Question Type : MCQ Option Shuffling : No

घटनेच्या कोणत्या कलमामध्ये 6 वर्षाखालील बालकांच्या शिक्षणाचा समावेश आहे ?

Options :

1. कलम 14

2. कलम 12

3. कलम 45

4. कलम 21

Question Number : 97 Question Id : 154787197 Question Type : MCQ Option Shuffling : No

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेचे लाभार्थी खालील प्रमाणे कोण आहेत ?

Options :

1. अनु. जमाती क्षेत्रातील 0 ते 3 वयोगटातील बालके

2. अनु. जाती क्षेत्रातील गरोदर स्त्रीया व स्तनदा माता.

3. अनु. जमाती क्षेत्रातील 7 महिने ते 6 वर्ष वयोगटातील बालके, गरोदर स्त्रीया व स्तनदा माता

4. अनु. जाती व अनु जमाती क्षेत्रातील 6 म. ते 6 वर्ष वयोगटातील बालके

Question Number : 98 Question Id : 154787198 Question Type : MCQ Option Shuffling : No

'बाळाला पहिले 6 महिने निव्वळ स्तनपान करणे' हे विधान _____.

Options :

1. बरोबर आहे

2. चुक आहे

3. अंशत: बरोबर आहे

4. अंशत: चुक आहे

Question Number : 99 Question Id : 154787199 Question Type : MCQ Option Shuffling : No

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रमाणे कोणत्या वर्षापर्यंत सहा वर्षाखालील सर्व बालकांना गुणवत्ता पुर्ण पुर्व प्राथमिक शिक्षण आणि काळजी उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ठ ठेवण्यात आले आहे ?

Options :

1. 2025

2. 2030

3. 2035

4. 2040

Question Number : 100 Question Id : 154787200 Question Type : MCQ Option Shuffling : No

खालीलपैकी कोणता कालावधी जागतिक स्तनपान सप्ताह म्हणून पाळला जातो ?

Options :

1. 1 ऑगष्ट ते 7 ऑगष्ट

2. 1 ऑक्टोंबर ते 7 ऑक्टोंबर

3. 15 डिसेंबर ते 21 डिसेंबर

4. 15 मार्च ते 21 मार्च